सोमवार दिनांक २८.१२.१९९२ रोजी संपन्न झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दुसऱ्या बैठकीचा स्थायी करण्यांत आलेला कार्यवृत्तांत.

Continued on 29.1.93 3rd meeting

## मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

सोमवार दिनांक २८.१२.१९९२ रोजी झालेल्या मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या २ -या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सोमवार दिनांक २८.१२.९२ रोजी सायंकाळी ३.३० वाजतां दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची २ री बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] डॉ. शंकर वामन मटकर | : | सभापती |
| २] श्री. पी. एस. भोगल | : | उपसभापती व मुख्य अधिकारी |
| ३] श्री. जयंतराव देशपांडे | : | सहसचिव, महाराष्ट्र राज्य |
| ४] श्री. खाडये | : | मुंबई महानगरपालिका प्रतिनिधी |
| ५] श्री. रॉकी क्रिस्टो | | सदस्य |
| ६] श्री. कमलाकर शर्मा | | |
| ७] श्री. विवेक शर्दू | | |
| ८] श्री. मोहम्मद फारुख मन्सूरी | | |
| ९] श्री. चेतन शहा | | |
| १०] श्री. व्ही.बी. वरसकर | | |
| ११] श्री. शंकर पिटला | | |
| १२] श्री. महंमद आजम खान | | |
| १३] श्री. हेमराज शहा | | |
| १४] श्री. गजेन्द्र लष्करी | | |
| १५] श्री. श्रीकांत पाटील, सहा. करनिर्धारक व संकलक. | | |
| १६] मुंबई म.न.पा. यांचे प्रतिनिधी | | |

माननिय सभापती डॉ. शंकरराव मटकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीस प्रारंभ झाला. सभेच्या सुरुवातीस सर्व सदस्यांचे विशेषत: शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाचे सहसचिव श्री. जयंतराव देशपांडे यांचे स्वागत करण्यांत आले. सभेचे नियमित कामकाज सुरु होण्यापूर्वी मा. सभापतीनी सहसचिव श्री. जयंतराव देशपांडे यांना मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दैनंदिन कामाविषयी तसेच धोरणात्मक बाबींविषयी मार्गदर्शन करण्याची विनंती केली. श्री. जयंतराव देशपांडे यांनी आपल्या भाषणांत असे प्रतिपादन केले की, मुंबई बेट क्षेत्रामधील जुन्या

व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्बांधणी कामास गती देण्याच्या दृष्टीने शासनाने मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची नियुक्ती केली आहे. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शहरातील विशिष्ठ विभागातील व मोक्याच्या ठिकाणी असलेल्या इमारतींची दुरुस्ती केली जाते. अशा इमारतींना दुरुस्तीची खरोखर आवश्यकता आहे काय ? याचा विचार मंडळाने करावा. कारण नसतांना इमारतीची दुरुस्ती करुन निधीचा अपव्यय करणे अनुचित आहे. अशा प्रकारांना पायबंद घालण्याच्यादृष्टीने मंडळाने आवश्यक ती उपाय योजना करावी. यावर मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी प्रश्न विचारला की, इमारत दुरुस्ती संदर्भात शासनाचे धोरण काय आहे व एक इमारत किती वेळा दुरुस्त करतां येते ? यावर श्री. जयंत देशपांडे यांनी स्पष्टीकरण केले की, या बाबतीत शासनाचे धोरण स्पष्ट आहे. एक इमारत आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त ४ वेळां दुरुस्त करण्यांत येते. मात्र हा नियम समजला जाऊं नये. दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता असेल व निधी उपलब्ध असेल तरच इमारतीची दुरुस्ती हाती घ्यावी, ४ वेळां दुरुस्त झालेली इमारत पुन्हा दुरुस्तीस आल्यास ती दुरुस्ती आर्थिकदृष्टया किफायतशीर नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

मा. सदस्य श्री. हेमराज शहा यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मुख्य अभियंता या पदाची आवश्यकता आहे. यावर श्री. जयंत देशपांडे यांनी खुलासा केला की, प्राधिकरणांत प्रत्येक मंडळासाठी मुख्य अभियंता नियुक्त केलेला आहे. पूर्वीच्या अनुभव असा होता, मंडळात मुख्य अभियंत्यांनी छाननी करुन मंडळाने मान्य केलेले प्रस्ताव प्राधिकरणातील कनिष्ठ अभियंत्यांपासून मुख्य अभियंत्याच्या स्तरांवर पुन्हा तपासले जात होते. यांत वेळेचा अपव्यय होत होता. या गोष्टींची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने प्राधिकरण स्तरांवर प्रत्येक मंडळासाठी मुख्य अभि-यंत्यांची नियुक्ती केलेली आहे. श्री. हेमराज शहा यांनी असेही प्रतिपादन केले की, दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांस मंजुरी दिल्यानंतर वारंवार सुधारीत अंदाजपत्रके मंजुरीसाठी येतात. कांही प्रसंगी काम सुरु झाले नसतानाही सुधारीत अंदाजपत्रक मंजुरीसाठी मंडळापुढे मंजुरीसाठी सादर

करण्याचे प्रकार घडले आहेत. या संदर्भात संबंधित अभियंत्यांनी खुलासा केला की, अनेक जुन्या इमारती पारंपारीक पध्दतीने बांधलेल्या आहेत. प्राथमिक तपासणीच्या वेळी दुरुस्तीकामाची व्याप्ती अचूकपणे निश्चित करतां येत नाही. अनेक इमारतीमध्ये प्रत्यक्ष कामास सुरुवात केल्यानंतर सुस्थितीत दिसणाऱ्या इमारतीच्या अन्य भागास दुरुस्ती आवश्यक असल्याचे निदर्शनास येते व या भागाची दुरुस्ती करण्यावाचून पर्याय नसतो. त्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक करणे अपरिहार्य असते. या संदर्भात मा. सदस्यांनी असे मत व्यक्त केले, मूळ अंदाजपत्रकांत १० टक्के वाढ झाली तर ते समजण्यासारखे आहे. परंतु ६०टक्केहून अधिक वाढ असमर्थनीय ठरेल.

सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, सुधारीत अंदाजपत्रके मुख्य अभियंता स्तरावर तपासून त्यानंतर मंडळापुढे मंजूरीसाठी सादर करावीत.

मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी मुद्दा उपस्थित केला की, काही उपकरपात्र इमारती दुरुस्ती उपकरांतुन वगळल्यामुळे त्यांची दुरुस्ती मंडळातर्फे करण्यांत येत नाही. अशा इमारतींच्या बाबतीत कोणती उपाय योजना करावी. यावर सदस्यांनी मत व्यक्त केले की, एकदां दुरुस्त झालेली इमारत उपकरांतुन वगळण्यांत येत नाही. परंतु ज्या इमारतींचा दुरुस्ती उपकर जमा केला आहे व दुरुस्ती न करतां उपकरांतुन वगळलेल्या आहेत, अशा इमारतींच्या रहिवाशांकडून वसूल केलेला दुरुस्ती उपकर त्यांना परत करण्याच्यादृष्टीने उपाय योजना करण्यांत यावी. तसेच दुरुस्ती उपकर करांतुन वगळलेल्या इमारतींची दुरुस्ती मुंबई महानगरपालिकामार्फत करतां येणे शक्य आहे काय या बाबतीत मा. सभापतींच्या स्तरावर संबंधितांशी चर्चा करून पुढील बैठकीपर्यंत उपाय योजना सुचविण्यांत यावी.

मा. सदस्य श्री. हेमराज शहा यांनी असे निदर्शनास आणून दिले की, प्राधिकरण अधिनियमांनुसार मंडळाचे कामकाज होत नाही. पूर्वी मंडळाच्या बैठकीत निर्णय झाल्याप्रमाणे कार्यवाही न होतां प्रकरणे मंडळापुढे विचारार्थ न येतां काही प्रकरणी प्रशासनाने परस्पर निर्णय घेतले आहेत. या संदर्भात उपसभापतींनी स्पष्टीकरण केले की, कांही प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार तांतडीने कार्यवाही करणे अत्यावश्यक असल्याने अशा प्रकरणी प्रशासकीय निर्णय घेणे आवश्यक होते.

मा. सदस्य श्री. हेमराज शहा यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आजच्या बैठकीपुढे अनेक दुरुस्तीच्या कामांची अंदाजपत्रके मंजूरीसाठी ठेवलेली आहेत. म्हाडा अधिनियम कलम १८[१०] मधील तरतुदींनुसार सदर कामकाज हे तांत्रिक समितीमार्फत करावयाचे आहे. या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. अनेक सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, पूर्वीच्या मुंबई गृहनिर्माण मंडळाची व्याप्ती फार मोठी असल्याने दुरुस्ती अंदाज पत्रकांची योग्य ती छाननी व्हावी या दृष्टीने तांत्रिक समितीची आवश्यकता होती. परंतु आता पूर्वीच्या मुंबई मंडळाची विभागणी होऊन ३ स्वतंत्र मंडळे झाल्यामुळे कलम १८[१०] मधील तरतुदींनुसार तांत्रिक समितीची नियुक्ती झाल्यास दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास विशेष काम उरणार नाही, त्यामुळे स्वतंत्र तांत्रिक समिती नियुक्त न करता हे कामकाज मंडळाने करावे असे मत व्यक्त करण्यात आले. चर्चेअंती पुढील ठराव सभागृहाने एकमताने संमत केला.

ठराव क्रमांक: २/१

म्हाडा अधिनियम उपकलम १८[१०] अन्वये नियुक्त करावयाची तांत्रिक समिती नियुक्त न झाल्यामुळे ही समिती नियुक्त होईपर्यंत तात्पुरती उपाय योजना म्हणून मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सर्व सभासद हे तांत्रिक समितीचे सभासद म्हणून कामकाज पहातील व दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने घेतलेले निर्णय हे तांत्रिक समितीचे निर्णय समजले जातील.

यानंतर सभेच्या नियमित कामास सुरुवात झाली.

बाब क्रमांक: २.१

विषय: दि.३०.११.९२ रोजी झालेल्या दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या पहिल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास मान्यता देणे.

या वृत्तांतावर पुढील सूचना करण्यात आल्या. श्री. हेमराज शहा यांनी सूचना केली की, पृष्ठ क्र.६ वरील पहिल्या परिच्छेदामधील "सचिव श्री. अतुल फुले यांनी या सूचनेची नोंद घेतली." हे वाक्य वगळण्यात यावे. चर्चेअंती ही सूचना मान्य करण्यात आली.

५१

e

श्री. फारुख मन्सुरी, मा. सदस्य यांनी या बैठकीत दुरुस्ती कामासाठी रु.५.०० कोटीचा निधी तातडीने उपस्थित करुन द्यावा अशी मागणी केली होती. या बाबीचे नोंद कार्यवृत्तांतात करण्यांत आली नाही असे श्री. फारुख मन्सुरी यांनी सांगितले. चर्चेअंती या बाबीची नोंद कार्यवृत्तांतात करण्यांत यावी असे ठरले.

श्री. विवेक भर्तू यांनी दि.२४.५.९० रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या दालनांत उपकरप्राप्त इमारतींची पुनर्बांधणी करतांना २.०० पर्यंत चटईक्षेत्र निर्देशांक वाढवून देण्याविषयीचा निर्णय सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला होता व त्यानुसार मंडळाने कार्यवाही करावी अशी सुचना केली होती. या बाबीची नोंद कार्यवृत्तांतात घेण्यांत आली नाही असे श्री. विवेक भर्तू यांनी सांगितले. चर्चेअंती ही बाब कार्यवृत्तांतात घ्यावी असे ठरले.

सविस्तर चर्चेअंती वरील सुधारणांसह दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १ ल्या बैठकीचा कार्यवृत्तांत एकमताने स्थायी करण्यांत आला.

निर्णयांची कार्यवाही ----

बैठकीतील निर्णयांच्या कार्यवाही संदर्भात पुढील माहिती देण्यांत आली.

मा. सदस्यांना ओळख-पत्रे व व्हिजिटिंग कार्डस् देण्याविषयी, या संदर्भात छपाईचे काम सुरु असून मा. सदस्यांनी आपले पासपोर्ट आकाराचे दोन फोटो सचिवांकडे देण्याची व्यवस्था करावी असे मा. सभापतींनी सांगितले.

श्री. जग्यासी, विशेष कार्य अधिकारी यांनी खुलासा केला की, मंजूर केलेल्या कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन न दिल्यामुळे या बैठकीत सादर करावयाची संक्रमण शिबिराची माहिती त्यांना बैठकीपुढे सादर करणे शक्य झाले नाही.

... ६.

बाब क्रमांक: २.२
[नु.क्र. ब-१ ते ब-६].

विषय: दि. २८.१०.९२ रोजी झालेल्या मुंबई मंडळाच्या बैठकीत दुरुस्ती व पुनर्बांधणी विभागा संबंधीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

सविस्तर चर्चेअंती मुंबई मंडळाच्या दिनांक २८.१०.९२ रोजी संपन्न झालेल्या १४२ व्या बैठकीतील दुरुस्ती व पुनर्बांधणी विभागा संबंधीचा कार्यवृत्तांत एकमताने स्थायी करण्यांत आला.

बाब क्रमांक: २.३
[नु.क्र. १ ते २५]

विषय: दि. ३०.१०.९२ रोजी झालेल्या तांत्रिक समितीच्या १२३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास मंजुरी.

श्री. हेमराज शहा : पृष्ठ क्र. १९ वरील निर्णय क्र. १२३.९.१ मधील तिस-या ओळीतील संख्या १०३ नसून १०४ आहे, असे सांगितले. निवासी कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, ही संख्या १०४ आहे. त्यानुसार कार्यवृत्तांतात दुरुस्ती करण्याचे ठरले.

श्री. हेमराज शहा : पृष्ठ क्र. १२३.९.३ मध्ये सुरुवातीस "सदर दोन्ही प्रस्तावावर.......हेमराज शहा यांनी व्यक्त केली." या ऐवजी "मा. सभापतींनी सदर इमारतीची स्वत: पहाणी करण्याची इच्छा व्यक्त केली असतां मा. सदस्य श्री. हेमराज शहा यांनी मत व्यक्त केले की, सर्व सदस्यांनी मा. सभापतींसोबत इमारतीची पहाणी करणे उचित ठरेल" असे वाक्य असावे. चर्चेअंती वरील सूचना मान्य करण्यांत आली.

सविस्तर चर्चेअंती वरील सुधारणांसह तांत्रिक समितीच्या १२३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांत एकमताने स्थायी करण्यांत आला.

बाब क्रमांक: २.४.१

## गीता बिल्डिंग सहकारी संस्थेचा प्रस्ताव.

या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी मा. सदस्यांनी तक्रार केली की, रहिवाशांकडून आलेले प्रस्ताव अनेक वर्षे मंडळाच्या कार्यालयात प्रलंबित रहातात. या प्रस्तावांवर विनाविलंब कार्यवाही व्हावी अशी मागणी सदस्यांनी केली. संबंधित कार्यकारी अभियंता श्री. अतुल हुले यांनी खुलासा केला की, पूर्वी रहिवाशांनी सादर केलेल्या प्रस्तावासोबत प्रॉपर्टी कार्ड, मुंबई महानगरपालिकेकडील आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती, रहिवाशांचे फोटो व वास्तव्याचे पुरावे या संबंधीची माहिती सादर न झाल्यामुळे प्रस्तावांची छाननी करण्यास विलंब होत होता. परंतु आता कार्यवाहीच्या पध्दतीत बदल केलेला आहे. सहकारी संस्थेचा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी इमारतीमधील रहिवाशांच्या सोईनुसार रहिवाशांची बैठक घेऊन त्यांना, कक्षाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून योजना व कायदेशीर तरतुदींविषयी पूर्ण माहिती दिली जाते. प्रस्तावासोबत कोणते कागदपत्र व दाखले जोडावे लागतात या विषयी मार्गदर्शन केले जाते. तसेच रहिवाशांच्या शंकांचे निरसन केले जाते. दस्तऐवजाच्या प्रती सुलभतेने प्राप्त करण्यासाठी कक्षाच्या अधिका-यांकडून जिल्हाधिकारी तसेच मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांशी संपर्क साधला जातो. त्यामुळे आता प्रस्तावांची छाननी करण्यास कमी अवधी लागतो. सविस्तर चर्चेअंती अशी सूचना करण्यात आली की, पूर्ण माहितीनिशी प्राप्त झालेले प्रस्ताव ६० दिवसांच्या कालावधीत मंजुरीसाठी मंडळापुढे सादर करण्यात यावेत. वरील सूचना मान्य करण्यात आली. श्री. हेमराज शहा यांनी सूचना केली की, बाब टिप्पणीच्या शेवटी प्रस्ताव सादर करणा-या अधिका-याचे नांव व हुद्दा नमूद करण्यात यावा. या संदर्भात खुलासा करण्यात आला की, पृष्ठ क्र. ५४, ५७ व ६०-व वर अशी माहिती देण्यात आली आहे. त्यावर सर्व टिप्पण्यावर अशी माहिती देण्यात यावी अशी सूचना सदस्यांनी केली व या सूचनेची नोंद घेण्यात आली. या चर्चेअंती गीता बिल्डिंग

१५

येथील सहकारी गृहनिर्माण संस्येस भूसंपादनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत आली.

<u>ठराव क्रमांक:</u> २/२

गीता बिल्डिंग क्र. २ या नांवाने ओळखली जाणारी इमारत, प्लॉट नं. ३४, भाउ दाजी रोड, माटुंगा, मुंबई-१९ येथील भूखंड व त्यावरील इमारत नियोजित सदानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादन करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

<u>बाब क्रमांक :</u>
[ पृष्ठ क्र. ५१ ]

विषय: यमुना निवास येथील एकता सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी इमारतीसह भूसंपादन करण्या संबंधीचा प्रस्ताव.

चर्चेअंती प्रस्ताव मान्य झाला.

<u>ठराव क्रमांक:</u> २/३

यमुना निवास इमारत क्र. १३-अ, १३-सी व १३-डी, भूखंड क्र. ६७२ एच. एस. रत्ळकर मार्ग, दादर, मुंबई-२८ येथील भूखंड व मालमत्ता "एकता" सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

...

बाब क्रमांक : २.४.३

पृष्ठ क्रमांक :- ५५

पोतदार निवास या इमारतीच्या नियोजित आर्शिवाद सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी भूसंपादन करण्याचा प्रस्ताव.

प्रस्तावास मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक २/४

पोतदार निवास या नावाने ओळखली जाणारी इमारत क्र. ८९ तात्या घारपुरे मार्ग, गिरगांव येथील भूखंड व त्यावरील इमारत नियोजित आर्शिवाद सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक -- २.४.४

पृष्ठ क्र. ५७ अ

लक्ष्मी निकेतन या इमारतीमधील रहिवाशांच्या गृहनिर्माण संस्थेसाठी संपादन करण्याचा प्रस्ताव.

सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला की ही इमारत भाडेपट्ट्यावरील असल्यामुळे या प्रस्तावास मंजूरी देता येईल काय ? यावर संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा केला की, अधिनियमांतील तरतूदी नुसार उपकरपात्र "अ" वर्गातील इमारतीमधील रहिवासी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी प्रस्ताव सादर करू शकतात व सर्व बाबींची पूर्तता करण्याऱ्या प्रस्तावाच्या संदर्भात म्हाडातर्फे भूसंपादन कार्यवाही करता येते. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला की भाडेपट्ट्यावरील जमिनीचे कायदेशीर रित्या अभिहस्तांतरण करणे शक्य आहे काय ? सविस्तर चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की या बाबतींत कायदेशीर सल्ला घेउन प्रकरण पुढील बैठकीस सादर करावे.

या सर्व सहकारी प्रस्तावांच्या बाबतीत मालकांना संघटनेने केलेले अपील सर्वोच्च न्यायापुढे प्रलंबित असून सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी जमिनीचा ताबा घेण्याव्यतिरिक्त अन्य कार्यवाही सुरु ठेवावी असे अंतरिम आदेश दिले आहेत अशी माहिती कार्यकारी अभियंत्यांनी दिली तरी पण सहकारी संस्थेकडून अनामत रक्कम घेण्यापूर्वी न्यायालयाचा निर्णय त्यांच्यावर बंधनकारक राहील अशी हमी

घेणे उचित ठरेल अशी सूचना सदस्यांना केली. या सूचनेची नोंद घेण्यांत आली.

बाब क्रमांक २.५.

प्राधिकरण अधिनियम ८८ [३] अनुसार इमारतींना द्यावयाचे प्रमाणपत्र.

पृष्ठ क्र. ५९

श्री. हेमराज शहा यांनी प्रश्न उपस्थित केला की १९७४ साली तोडलेल्या २-या मजल्या वरील भाडेकरुना सन ९२ मध्ये व्हेकेशन नोटीसकां देण्यात आल्या ? सविस्तर चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला या सर्व माहितीसह हे प्रकरण पुढील बैठकीत सादर करणे.

सदस्यांच्या विनंतीनुसार सायं. ५.३० वाजता बैठक स्थगित करून सुरु करावी असे ठरले. दि. २८.१२.९२ रोजी स्थगित होच बैठक दिनांक २९.१२.९२ रोजी स्थगित करण्यांत आलेली २ री बैठक दिनांक २९.१२.९२ रोजी सकाळी ११.०० वाजता पुढे सुरु झाली.

कामकाज सुरुवात होण्यापूर्वी मा. सदस्यांनी विचारणा केली की, या बैठकीत कार्यकारी अभियंता का उपस्थित नाहीत. मा. सभापतींनी खुलासा केला प्रथेप्रमाणे मंडळाच्या बैठकीत फक्त मंडळाचे सदस्य व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित राहू शकतात त्यामुळे मंडळाच्या बैठकीत फक्त विभाग प्रमुखांनी उपस्थित रहावे असे ठरले आहे. या संदर्भात मा. सदस्यांनी प्रतिपादन केले की तांत्रिक समिती-पुढे दुरुस्तीची अनेक अंदाजपत्रके असल्यामुळे संबंधित कार्यकारी अभियंतेच इमारती-संबंधीचा तपशिल देऊ शकतात. त्यामुळे संबंधित कार्यकारी अभियंते बैठकीस उप-स्थित रहाणे अत्यावश्यक आहे. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, संबंधित विभाग प्रमुखांनी विषयाची पूर्ण तयारी करून यावे व आवश्यकतेनुसार सदस्यांना तपशिल देण्यासाठी संबंधित कार्यकारी अभियंतास बैठकीसाठी बोलवावे.

बाब क्रमांक २.६.

पृष्ठ क्र. ६३ ते २११

उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी मंजूरी दिलेल्या नकाशे व अंदाजपत्रकास तांत्रिक समितीने मंजूरी देण्या बाबत.

या संदर्भात मा. सदस्य श्री. हेमराज शहा यांनी प्रश्न केला की हे प्रस्ताव मंडळाच्या माहितीसाठी की मंजूरीसाठी सादर केले आहेत ? याचा खुलासा करावा. यावर सचिवांनी खुलासा केला की दि. २३.१२.९२ रोजी झालेल्या तांत्रिक समितीच्या ११६ व्या बैठकीत केलेल्या अधिकार प्रदानानुसार प्रति चौ. मी. ५०० /- पर्यन्त खर्च असणा-या व तातडीने दुरूस्तीची आवश्यकता असणा-या इमारतींची दुरूस्ती अंदाजपत्रके संबंधित उपमुख्य अभियंता नी मंजूर करून तांत्रिक समितीच्या बैठकीपुढे कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करावीत असे ठरले होते. अत्यंत तातडीच्या दुरूस्तीच्या संदर्भात कालापव्यय होउ नये या दृष्टीने हा निर्णय तांत्रिक समितीने घेतला होता असे सांगण्यात आले. यावर श्री. हेमराज शहा यांनी सांगितले की पृष्ठ क्र. ६६ वर नकाशे व अंदाजपत्रके तांत्रिक समितीच्या माहितीसाठी की मंजूरीसाठी आहेत याचे स्पष्टीकरण व्हावे. संबंधित उपमुख्य अभियंता यांनी खुलासा केला की, ही अंदाजपत्रके तांत्रिक समितीच्या "कार्योत्तर मंजूरीसाठी" सादर केली आहेत. टंकलेखनाच्या चुकीमुळे "कार्योत्तर मंजूरीसाठी" हा शब्दप्रयोग राहून गेला आहे. त्यामुळे सदर प्रस्तावात "नकाशे व अंदाजपत्रके तांत्रिक समितीच्या माहिती व कार्योत्तर मंजुरीसाठी सादर" असे वाचावे असे त्यांनी स्पष्टीकरण केले, ~~की~~, या प्रस्तावातील दुरूस्त्या संबंधित अधिका-यांनी काळजी पूर्वक पहाण्याची आवश्यकता होती. सविस्तर चर्चेअंती मा. सभापतींनी प्रतिपादन केले की, बैठकीसाठी दिलेल्या प्रस्तावांचा सदस्यांकडून काळजी पूर्वक अभ्यास केला जातो मात्र अधिका-यांकडून हे प्रस्ताव वाचलेसुध्दा जात नसावेत असे आजच्या अनुभवावरून सिध्द होत आहे. यापुढे सर्व अधिका-यांनी प्रस्तावाचा परिपूर्ण अभ्यास करूनच प्रस्ताव सादर करावेत. व आवश्यक त्या दुरूस्त्यांची सभागृहात आगाउ कल्पना द्यावी अशी सूचना मा. सभापतींनी केली.

पृष्ठ क्र. ६७ वरिल हाफीज मंजील सेंट पॉल स्ट्रीट या इमारतीच्या दुरूस्ती प्रस्तावात क्षेत्रफळामध्ये फरक असल्याचे मा. सदस्यांनी आपून दिले. क्षेत्रफळा-मध्ये फरक का आला या सदस्यांच्या प्रश्नाचे संबंधित अधिकारी योग्य प्रकारे निरसन करू शकले नाही. सविस्तर चर्चेअंती, क्षेत्रफळामध्ये फरक असणारे परिशिष्ट "अ" मधील प्रस्ताव संबंधित उपमुख्य अभियंता यांनी सविस्तर तपासून पुढील बैठकीत पुढे सादर करावेत असे ठरले.

बाब क्रमांक : २.७ व २.८ –

पृष्ठ क्र. २९३ ते ३८९

मा. सदस्य श्री. हेमराज शहा यांनी असे निदर्शनास आणून दिलेले की पृष्ठ क्र. ३७५ अ वर २-८ सिंधी लेन या इमारतीचे तिस-या टप्प्याचे सुधारीत अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर केले आहे. टिप्पणीत सादर केलेल्या माहितीनुसार दुरूस्तीचे काम सुरु होणार आहे. तरी दुरूस्तीच्या कामास सुरुवात होण्यापूर्वीच सुधारीत अंदाजपत्रक मंजुरीसाठी कसे काय सादर केले याचा खुलासा त्यांनी मागितला. उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी खुलासा केला की या इमारतीचे ३ –या टप्प्याचे काम प्रगतीपथावर आहे. टिप्पणीत दुरूस्तीचे काम मंडळातर्फे सुरू आहे असा शेरा पाहिजे होता, परंतु टंकलेखनाच्या चुकीमुळे काम मंडळातर्फे सुरू होणार आहे. असा शेरा छापला गेला आहे. यासंबंधी आवश्यक ती दुरूस्ती करण्यांत आली आणि संबंधित अभियंत्यांना सक्त सूचना देण्यांत आली की यापुढे बाब टिप्पणी सादर करतांना योग्य ती काळजी घेण्यांत यावी व चुकीची दुरूस्ती मा. सदस्यांना आगावू कळविण्यांत यावी.

सर्व सदस्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, बहुतेक सर्व सुधारीत अंदाजपत्रकांत लक्षणीय वाढ झाली आहे. ही वाढ का आली याचा खुलासा करण्यांत यावा. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की सर्व सुधारीत अंदाजपत्रके [परिशिष्ट "अ"] मुख्य अभियंता यांना तपासून पुढील बैठकीपुढे सादर करावीत.

सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, अनेक इमारतींचा
दुरूस्ती उपकर मोठ्या प्रमाणांत वसूल व्हावयाचा आहे. दुरूस्ती उपकर थकीत असणा-या
इमारतींची दुरूस्ती करणे योग्य ठरणार नाही. असे मत सदस्यांनी व्यक्त केले, मुंबई
म.न.पा. संबंधित अधिका-यांनी खुलासा केला की, शासनाच्या वतीने दुरूस्ती उपक-
राची वसूली मुंबई म.न.पा. तर्फे एजन्सी पध्दतीवर केली जाते. मुंबई महानगरपालिका
च्या अधिनियमांत दुरूस्ती उपकर न भरणा-या मालक/रहिवाशी/यांच्याविरुध्द कार्यवाही
करण्याविषयींची निश्चित तरतूद नाही. या संदर्भात शासनाच्या वरील स्तरावर
लवकरच चर्चा होणार असल्याची ही माहिती देण्यांत आली. सविस्तर चर्चेअंती असे
ठरले की, दुरूस्ती उपकराची थकबाकीची सविस्तर वसूली संदर्भात मुंबई म.न.पा.
तर्फे पुढील कार्यवाही करण्यांत येईल. दुरूस्ती उपकराच्या थकबाकीसंबंधी माहिती मुंबई
म.न.पा. स सादर करण्याच्या शर्तीवर परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविलेल्या इमारतीच्या
दुरूस्ती अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत आली. यापैकी परिशिष्ट "क" मध्ये दर्शविलेल्या
इमारती माननीय सदस्यांनी पाहणी करुन त्यांच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही
कार्यवाही करण्याच्या शर्तीवर मंजूरी देण्यात आली.

ठराव क्र. २/५

उत्तर व दक्षिण परिमंडळातील विविध टप्प्यामधील परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविलेली एकूण ५३ नकाशे व अंदाजपत्रके यांना दुरुस्ती उपकरांच्या थकबाकीची माहिती मुंबई महानगरपालिकेस कळविण्यांच्या शर्तीवर मान्यता दिली आहे व परिशिष्ट "क" मध्ये दर्शविलेल्या एकूण ११ इमारतींच्या नकाशे व अंदाजपत्रकांना मा. सदस्यांच्या संयुक्त पहाणी व अहवालानंतर मान्यता देण्यांत यावी असा निर्णय झाला.

बाब क्र. २.८

पृष्ठ क्र. ३९१

सविस्तर चर्चेअंती असे ठरले की "ब" विभागातील ९ अब्दुल रहेमान स्ट्रीट, या इमारतीची संयुक्त पहाणी उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी माननीय सदस्य श्री. गजेंद्र लष्करी व श्रीकांत पाटील यांचे समवेत करावी व अहवाल पुढील बैठकीत सादर करावा.

बाब क्र. २.१०

पृ. क्र. ३९३

उपकरप्राप्त इमारतीमधील सामाईक शौचालयाच्या व रु. ५०,०००/- पर्यन्त तातडीच्या दुरुस्तीच्या कामाकरिता उपमुख्य अभियंता यांना प्रदान करणे.

याविषयावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती निर्णय घेण्यांत आला की, सामाईक संडासांच्या तातडीच्या व रु. ५०,०००/- पर्यन्त खर्चाच्या दुरुस्तीचे प्रस्ताव संबंधीत उपमुख्य अभियंता यांनी मुख्य अभियंता, प्राधिकरण-२ यांचेकडून मंजूर करून घ्यावे व पुढील कार्यवाही करून सदर प्रस्ताव मंडळाच्या बैठकीपुढे कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करावेत.

ठराव क्र. २/६

उपकर पात्र इमारतींच्या समाईक संडासांच्या तातडीच्या दुरुस्ती साठी रु. ५०,०००/- पर्यन्त खर्चाची मर्यादा असलेली अंदाजपत्रके मुख्य अभियंता प्राधिकरण- २ यांना पूर्व मंजुरीने मंजूर करून पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार संबंधित उपमुख्य अभियंत्यांना प्रदान करण्याचा ठराव एकमताने मंजूर झाला.

सदर प्रस्तावास मंडळाची/तांत्रिक समितीची कार्योत्तर मंजूरी घेण्यांत यावी.

बाब क्र. ११

पृष्ठ क्र. ३९७ ते ४११

कार्यवाहीचा तक्ता.

पृष्ठ क्र. ३९७-३९९ "ना हरकत प्रमाणपत्र" धारक व वास्तुशास्त्रज्ञ यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्याच्या दृष्टीने विधी सल्लागार/प्राधिकरण यांचेकडून अद्यापपर्यन्त उत्तर न आल्याची माहीती उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी सभागृहास दिली. सदर माहीती प्राप्त करुन सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करणे अशा सूचना संबंधितांना देण्यांत आल्या. अन्य बाबींची नोंद घेण्यांत आली व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची सूचना संबंधितांना देण्यांत आली.

बाब क्र. :-

पृष्ठ क्र. ४११

या विषयासंबंधी सुधारीत अंदाजपत्रक पुढील बैठकीपुढे मान्यतेसाठी सादर करावे अशी सूचना संबंधितांना देण्यांत आली.

बाब क्र.

पृष्ठ क्र. ४१३

इमारत क्र. १६ जी ते के नौशीर भरुचा मार्ग, "डी" विभाग या इमारतीची पुनर्रचना योजना इमारत क्र. ८ च्या पायावरील बांधकामाची निविदा मंजूर करण्याबाबत.

उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी या प्रस्तावाविषयी सविस्तर माहिती दिली. निविदा स्विकारण्याचा ग्राहय कालावधी २९ डिसेंबर १९९२ पर्यन्त असल्याची माहीती देऊन त्यांनी या प्रस्तावास मंजूरी देण्याची विनंती सभागृहास केली.

मा. सदस्यांनी अशी सूचना केली की, या विषयाचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा कालावधी न मिळाल्यामुळे ही बाब पुढील बैठकीपुढे सादर करावी.

मा. सदस्य श्री. हेमराज शहा यांनी अशी तक्रार केली. सर्व निविदा मंडळापुढे मंजुरीसाठी येणे आवश्यक असतांना ठराविक निविदा मंडळापुढे येतात

व इतर निविदा संबंधित अभियंते स्वत:च्या अधिकारांत मंजूर करतात हे योग्य नाही. याबाबतीत खुलासा करण्यात आला की दुरूस्ती पुनर्वाधणीच्या सर्व कामांची अंदाजपत्रके प्रशासकीय मंजुरीसाठी तांत्रिक समितीपुढे सादर केली जातात. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या"मॅन्युअल" प्रमाणे प्राधिकरणाने ठराव क्र. १४८५ दि. १३.११.८७ अन्वये तांत्रिक मंजूरी व निविदा स्विकृतीचे पुढीलप्रमाणे अधिकार संबंधित अभियंत्यांना प्रदान केलेले आहे.

| | |
|---|---|
| १] रु. ५.०० लाख पर्यंन्त खर्चाची निविदा. | कार्यकारी अभियंता |
| २] रु. ५.०० लाख ते रु. २५.०० लाख खर्चाची निविदा. | उपमुख्य अभियंता |
| ३] रु. २५.०० लाख ते रु. ५०.०० लाख खर्चाची निविदा | मुख्य अभियंता |
| ४] रु. ५०.०० लाख ते रु. १००.०० लाख खर्चाची निविदा | विभागीय मंडळ |
| ५] रु. १००.०० लाखाच्या वरील निविदा. | प्राधिकरण |

प्राधिकरणाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार कार्यवाही करण्यांत येते. अशी माहीती देण्यांत आली. सविस्तर चर्चेअंती सदर निविदेचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे ठरले.

बाब क्र. २.१५

अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषयांवर चर्चा

१] मा. सदस्य श्रीकांत पाटील यांनी संक्रमण शिबीरातील दिवाबत्ती, साफसफाई व दुरूस्ती या संदर्भात कोणती कार्यवाही केली यासंबंधी माहीती देण्याची विनंती केली. उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी या कामासाठी निविदा मागविलेल्या आहेत. व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल अशी माहिती दिली. यासंबंधीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याची सूचना देण्यांत आली.

२] संक्रमण शिबीरांतील घुसखोरांना काढून टाकण्याविषयी कोणती उपाय-योजना केली अशी माहिती देण्याची विनंती मा. सदस्य श्रीकांत पाटील यांनी केली.

विशेष कार्य अधिकारी [सं. शि.] यांनी अशी माहिती दिली की, मध्यंतरीच्या तणावाच्या वातावरणामुळे यासंदर्भात कार्यवाही करणे शक्य झाले नाही. यासंबंधीचा सविस्तर अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याची सूचना देण्यात आली.

३] हुसेनी बिल्डींग या अपघातग्रस्त इमारतीच्या रहिवाशांना अविश्रांत परिश्रम करून तत्परतेने योग्य ते सहाय्य दिल्याबद्दल संबंधित अभियंत्यांना मा. सदस्य श्री. गजेन्द्र लष्करी यांनी धन्यवाद दिले संबंधित अभियंते व कर्मचारी यांच्या स्तुत्य कामाची सभागृहाने नोंद घेतली.

४] मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी विचारणा केली की, मुख्य अभियंता श्री. वाणी साहेब या सभेला का उपस्थित नाहीत ? सचिवांनी खुलासा केला की, मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना बैठकीचे निमंत्रण व कार्यसूत्री पाठविली होती, परंतु चौकशी अंती असे कळते की, सदर निमंत्रण मुख्य अभियंता/प्राधिकरण श्री. मान्नीकर यांचेकडे गेले आहे. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, यापुढे मुख्य अभियंता/प्राधिकरण यांची निमंत्रण श्री. वाणी यांचे नांवाने पाठविण्यात यावी.

आयत्या वेळचे विषय ——

नुकत्याच झालेल्या दंगलीत नुकसान पोहोचलेल्या ३८ कामाठीपुरा, ११वी गल्ली या इमारतींच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक आयत्या वेळेची बाब म्हणून मंजूर करावे. अशी विनंती उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी सभागृहास केली. दंगलीत नुकसान झाल्यामुळेहा प्रस्ताव आयत्या वेळेची बाब म्हणून चर्चेस घेण्यास सभागृहाने मान्यता दिली. सविस्तर चर्चेअंती या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावाची नोंद परिशिष्ट व मध्ये अनु. ५३ वर केली आहे.

सचिव, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, यांनी मा. सभापती, मंडळाचे सर्व सदस्य मुंबई महानगर पालिकेचे निमंत्रीत अधिकारी व मंडळाचे अधिकारी यांचे आभार मानले. व मा. सभापतींच्या संम्मतीने सायंकाळी ५.०० वा. बैठकीचे कामकाज संपविण्यात आले.

सभापती
मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

## परिशिष्ट - "अ"

क्षेत्रकाळातील फरक व सुधारीत अंदाजपत्रके यांची संबंधित उपमुख्य अभियंता व उपमुख्य अभियंता [ दु. व दु. ] यांनी तपासणी करुन पुढील बैठकीपुढे सादर करावयाची अंदाजपत्रके

| अ. क्र. | पृष्ठ क्रमांक | इमारतीचे नांव | विभाग |
|---|---|---|---|
| १. | ६७ | हाफीज मंजील, सेंट पॉल स्ट्रीट | फग/द |
| २ | ७३ | ३६-३८ लक्ष्मी बिल्डिंग, [illegible] | फ[illegible]/[illegible] |
| ३. | ८३ | ३४७- बी, पाणी चाळ, ना. म. जोशी मार्ग | -"- |
| ३. ४ | ८७ | कोंडाजी चाळ नं. ५, जेरभाई वाडीया रोड | -"- |
| ४. ५ | ९१ | १०२, ओल्ड प्रभादेवी रोड | -"- |
| ६. | ९५ | ७२-बी, सायानी रोड | -"- |
| ६. ७ | १०१ | ११४- एफ, बाबासाहेब आंबेडकर मार्ग | "ई-१" |
| ७. ८ | ११७ | ६-६. ए नवरोजी हिल रोड | ब |
| ९ | १२७ | ४४, कामाठीपुरा ३ री गल्ली | ई-२ |
| ९. ११ | १२९ | ५०, वरंगटे सदन गणेश गल्ली | फग/द |
| १०. | १३५ | ५०-६३ x १०, मौलाना आझाद रोड | ई-२ |
| १२ | १३७ | १०९ कामाठीपुरा [illegible] गल्ली | ई-२ |
| १३. | १३९ | ११०/७४ लक्ष्मी बिल्डींग, आईमाई मेरवानजी रोड | फग/द |
| १४ | १४१ | १०४-१०८, काटावाला बिल्डींग | फ/उ |
| १५ | १४३ | २१८, गुलखोजा चाळ, दत्ताराम लाडमार्ग | फ/द |
| १६ | १५५ | २२- डी नवाब टॅंक रोड | ई-१ |
| १५ | १५९ | भगीरथी भवन, गणेश गल्ली | फ/द |
| १६ | १८३ | ८९-९१ झकेरिया मस्जिद स्ट्रीट | ब |
| १७ | १८७ | ५४-ई सुरशेटजी राणा स्ट्रीट | डी-२ |
| १८. २० | १९५ | १६५-१६७ नागदेवी स्ट्रीट | ब |
| १९. २१ | २०१ | ६८, वुड हाऊस रोड | अ |
| २२ | २०७ | ११८-१२२, मसजिद स्ट्रीट | सी/१, २ |
| २३. | २११ | १५३, जंजीकर स्ट्रीट | ब |
| २४ | २२३ | ६, वाडीया स्ट्रीट | डी-२ |
| २५ | २२९ | ७-११, कोळसा स्ट्रीट | ब |
| २६ | २३३ | २८-२९ काबेकर स्ट्रीट | ब |
| २७ | २३७ | ११४, सारंग स्ट्रीट | ब |

परिशिष्ट - "अ"

| | | | |
|---|---|---|---|
| २६. | २४७ | १० पाहला पारशीवाडा | "डो"-२ |
| २७. | २५९ | ५५-५७ बाबू गेनू रोड | "सो"-३/४ |
| २८. | २६१ | ३५८ जो जगन्नाथ शंकरशेट मार्ग | "सो"-३/४ |
| २९. | २६५ | २, जांभूळवाडो, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग | "सो"-३/४ |
| ३०. | ३०३ | ३५७, गणपतराव कदम मार्ग | कग/द |
| ३१. | ३०७ | ७/१३, इस्माईल बिल्डींग, वीर सावरकर मार्ग. | कग/द |
| ३२. | ३११ | १५६, बाळशेठ मुरुळकर मार्ग | कग/द |
| ३३. | ३१५ | २५, मस्जिद स्ट्रीट | सो-१/२ |
| ३४. | ३१७-अ | ७, मस्जिद स्ट्रीट | सो-१/२ |
| ३५. | ३१९ | २, हरिश्चंद्र गोरेगांवकर रोड | डो-१ |
| ३६. | ३२३ | सी-१, नोसरवानजी पेटीट स्ट्रीट | डो-२ |
| ३७. | ७३ | ३६-३८ लक्ष्मी बिल्डींग जगन्नाथ मातनकर मार्ग | कग/द |
| ३८. | ३२५ | १०९, कामाठीपुरा दुसरो गल्ली | ई-२ |
| ३९. | ३२९ | २० बी स्लेटर रोड | |
| ४०. | ३३३ | २३०-२३४ फॉकलँड रोड | डो-२ |
| ४१. | ३३९ | ३ चुनाम लेन | डो-२ |
| ४२. | ३४३ | ९ डॉ. भाजेकर स्ट्रीट | डो-२ |
| ४३. | ३४७ | १४, त्रिभुवन रोड | डो-२ |
| ४४. | ३५३ | ६७०-६७० ऐ ना. म. जोशी मार्ग | ई-२ |
| ४५. | ३५७ | आगाखान बिल्डींग, मौलाना आझाद रोड | ई-२ |
| ४६. | ३६१ | १८३ अ रेखा कुटीर वीर सावरकर मार्ग | कग/द |
| ४७. | ३६५ | ३८१, काळबादेवी रोड | सो-३/४ |
| ४८. | ३७१ | डॉ. आत्माराम मर्चंट मार्ग | सो-३/४ |
| ४९. | ३७५ | २-८ सिंधी लेन | सो- १/२ |
| ५०. | ३७७ | १ मल्हार वाडी, काळबादेवी | सो- ३/४ |
| ५१. | ३८५ | १८८, जो पो. जे. मार्ग | डो-१ |
| ५२. | ३८९ | ९-१५ दुसरो फॉकलँड रोड | ब |

## परिशिष्ट - "ब"

दुरुस्ती उपकर थकबाकीसंबंधी माहिती मुंबई महानगरपालिकेस कळविण्याच्या शर्तीवर मंजूर झालेल्या अंदाजपत्रकांची यादी.

| अ.क्र. | पृष्ठ क्रमांक | इमारतीचे नांव | विभाग |
|---|---|---|---|
| १. | ६५ | ३६-ए, निखील बिल्डींग, शिवडी वडाळा रोड | फग/उ |
| २. | ७१ | १२४, रुक्मीणी निवास एस. एस. वाघ मार्ग | फग/४ |
| ३. | ७७ | १७९, जेठा बिल्डिंग, डॉ. एस. एस. राव मार्ग | फग/द |
| ४. | ७९ | १६५ एफ, मौलाना आझाद रोड | ई-२ |
| ५. | ८१ | ७१, त्रिवेदी बिल्डींग, भाऊदाजी रोड | फग-उ |
| ६. | ९७ | २८, मारवाडी चाळ, शंकरराव नम मार्ग | फग/द |
| ७. | ९९ | ३, दागीनावाला चाळ, सेनापती बापट मार्ग | फग/द |
| ८. | १०३ | १७६, आर्दशीर दादी स्ट्रीट | डी-२ |
| ९. | १०५ | १७, वाडीया स्ट्रीट | डी-२ |
| १०. | १०७ | २७१-२६३ युसुफ मेहरअल्ली रोड | ब |
| ११. | १०९ | १७७ शायदा मार्ग | ब |
| १२. | १११ | ६०-६३ धनजी स्ट्रीट | सी- १/२ |
| १३. | ११३ | १६ बी बाबुलनाथ रोड | बी-१ |
| १४. | ११५ | २२-२८ अगोली स्ट्रीट | अ |
| १५. | १२१ | ६ वाळकेश्वर रोड | डी-१ |
| १६. | १२३ | १४१-१४५ वाळकेश्वर रोड | डी-१ |
| १७. | १२५ | १२९-१३१ शंकर पुष्पाला मार्ग, | ई-२ |
| १८. | १३३ | १३५ ए, सुभाष लेन | ई-१ |
| १९. | १४३ | ७७, मोदी रोड, माहिम | फग/उ |
| २०. | १४५ | कृष्णा नि. नं. ४, गोखले सोसायटी लेन | फग/द |
| २१. | १४७ | ६५८-६७८ सी, ना. म. जोशी मार्ग | ई-२ |
| २२. | १४९ | ८७ जे शांतीकुंज नायगांव रोड | फग/द |
| २३. | १५७ | ४८-५० शेख बुरान कमरुद्दिन मार्ग | ई-२ |
| २४. | १६३ | २५-२१ ई मुनीर मॅन्शन एलफिन्स्टन रोड | फग/द |
| २५. | १६५ | १५३ क, राणे बिल्डींग ई मोजेस रोड | फग/द |

३२

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| २६. | १६७ | ३३९–३४१ रे रोड | |
| २७. | १७१ | १२५ सुरेंद्र सद्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग | क्ग/ड |
| २८. | १७३ | ५; कामाठीपुरा, १५ वी गल्ली | ई–२ |
| २९. | १७५ | १९–२३ शेख नुरान शमसुद्दीन मार्ग | ई–२ |
| ३०. | १७७ | ५९ सॅम्युअल स्ट्रीट | ब |
| ३१. | १७९ | २२, २ री बोरळवाडी, काळबादेवी | सी– ३/४. |
| ३२. | १८१ | १४५–१४७ निशाणपाडा रोड | ब |
| ३३. | १८१–अ | ४, डॉ. भालेराव मार्ग ... | डी–१ |
| ३४. | १९१ | ५१–५७ २ री मरीन स्ट्रीट | सी– ३/४ |
| ३५. | १९३ | १६, धोंबी स्ट्रीट | ब |
| ३६. | १९९ | २–९, मद्र गल्ली झवेरी बाजार | सी– ३/४ |
| ३७. | २०३ | २४, दुसरा भोईवाडा | सी– १/२ |
| ३८. | २०५ | ११०–११२ संतसेना मार्ग | सी– १/२ |
| ३९. | २११ | ३०–५० एम. एस. अली रोड | डी–२ |
| ४०. | २१३ | १३०–१३६ ढब्बू स्ट्रीट | सी– १/[illegible] |
| ४१. | २१५ | ३१–३३ क्रिकेट रोड | सी– ३/४ |
| ४२. | २१७ | ११२ डॉ. भडकमकर मार्ग | डी–२ |
| ४३. | २२१ | १८०–१९४ विठ्ठलभाई पटेल रोड | डी–१ |
| ४४. | २२७ | ३३–४० त्रिभुवन रोड | डी–२ |
| ४५. | २४१ | १० हमाल स्ट्रीट | अ |
| ४६. | २४३ | ६०–६६ गोवा स्ट्रीट | अ |
| ४७. | २४५ | ११६ आर्देशर दादी स्ट्रीट | डी–२ |
| ४८. | २५३ | २७५ बी, जाफजी दादाजी रोड | डी–२ |
| ४९. | २५५ | १९ ओल्ड पंगाजी पूरा | प |
| ५०. | २५७ | २४६–२५० युसुफ मेहेरअल्ली रोड | ब |
| ५१. | २९५ | १९१ संतसेना महाराज मार्ग | सी– १/२ |
| | २९९ | ३–५ उरणवाला स्ट्रीट | डी–२ |
| | | ३८, कामाठीपुरा ११ वी गल्ली | ई–२ |

# परिशिष्ट – [क]

## मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दुसरी बैठक

मा: सदस्यांनी संयुक्त पहाणी करुन अहवाल सादर केल्यानंतर

मंजूरी द्यावयाची अंदाजपत्रके

| अ. क्र. | पृष्ठ क्र. | सदस्याचे नांव | इमारतीचे नांव |
|---|---|---|---|
| १. | २६९ | श्री. व्ही. पी. वरसकर | ६९, कामाठीपुरा २ री गल्ली |
| २. | २७१ | श्री. गजेंद्र लष्करी | १२८–१३० सारंग स्ट्रीट |
| ३. | २७५ | महमंद आजम खाजम खान | ९३ संतसेना महाराज मार्ग |
| ४. | २७७३ | रॉकी क्रिस्टी | ५४/५६ पहिलापठाण स्ट्रीट |
| ५. | २९७ | श्री. शंकरराव पिटला | १७२–१७६ शेख मेमन स्ट्रीट |
| ६. | २८३ | श्री. श्रीकांत पाटील | २९ सदाशिव क्रॉस लेन |
| ७. | २८३ अ | श्री. चेतन शहा | २४, नबीउल्ला स्ट्रीट |
| ८. | २८५ | कमलाकर शर्मा | २१०, फॉकलँड रोड |
| ९. | २८७ अ | श्री. विवेक भर्तु | ४१–४५ सुतार चाळ |
| १०. | २८९ | श्री. फारुख मन्सुरी | १९२–२०२ डॉ. भडकमकर मार्ग |
| ११. | २९३ | श्री. हेमराज शहा | १९१, संतसेना मार्ग |

सचिव
मुंबई इमारत दुरुस्ती व पु. मंडळ.

सभापती,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

सभापती
मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ